सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २२० • शनिवार दि.३० मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## दिल्लीत मोठा दहशतवादी कट उधळला!;९ संशयित दहशतवादी अटकेत

नवी दिल्ली:दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने मोठी कारवाई करत राजधानीत घडवून आणला जाणारा संभाव्य दहशतवादी हल्ला उधळून लावला आहे. पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय आणि मुंबईतील अंडरवर्ल्ड नेटवर्कच्या सांगण्यावरून काम करणाऱ्या नऊ संशयितांना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या संशयितांना दिल्लीतील संवेदनशील आणि महत्त्वाच्या ठिकाणांसह सुरक्षा दलांवर हल्ले करण्याचे निर्देश देण्यात आले होते. गुप्त माहितीच्या आधारे विशेष पथकाने काही दिवसांपासून या संशयितांवर पाळत ठेवली होती.त्यानंतर छापेमारी करून पान ४ वर

# भर उन्हात जरांगे-विखे पाटलांत चर्चा



## सरकारच्या पाच आश्वासनावर जरांगे पाटील निर्णय घेणार

अंतरवाली सराटी:मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सुरु केलेल्या उपोषणाच्या पहिल्याच दिवशी फडणवीस सरकारने सकारात्मक भूमीका घेत जरांगे पाटील यांच्या दहा मागण्यांवर पाच मोठी आश्वासने दिली आहेत. या आश्वासनांचा ड्राफ्ट घेवून शनिवार दि.३० मे रोजी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे पोहचलेले राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना भर तपत्या उन्हात जरांगेंशी चर्चा करावी लागली.. राज्य शासपनाने दिलेल्या आश्वासनाबाबत सहकार्यांशी चर्चा केल्यानंतरच उपोषणाबाबत निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा करीत जरांगे यांनी आपले उपोषण सुरुच ठेवले आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शनिवार दि.३० मे रोजी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे पुन्हा एकदा आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. रखरखत्या उन्हात सुरू झालेल्या या आंदोलनामुळे राज्य सरकारची चांगलीच धावपळ उडाली आहे. जरांगे यांच्या प्रमुख मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी शासनाने विशेष मसुदा तयार करून मराठा आरक्षण विषयक राज्य मंत्रिमंडळाच्या उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने अंतरवाली सराटीत येथील शेताच्या रानात उपोषणास बसलेल्या जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली.

**सरकारची भूमीका पारदर्शक-मुख्यमंत्री**

उपोषण सुरू होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर पहिली प्रतिक्रिया देत सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक असल्याचे स्पष्ट केले. सरकारची भूमिका पारदर्शक आहे. आम्ही समाजांना एकमेकांसमोर उभे करून संघर्ष निर्माण करणारे नाही. संविधान, कायदा आणि न्यायालयाच्या चौकटीत राहून मराठा समाजाला न्याय देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे, असे फडणवीस म्हणाले.त्यांनी पुढे सांगितले की, एका समाजाचे आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला देण्याची भूमिका सरकारची नाही. मराठा समाजाच्या मागण्यांचा सकारात्मक विचार केला जाईल, मात्र ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ दिला जाणार नाही. असे ठणकावून सांगितले.

दरम्यान, उपोषण सुरू करण्यापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर टीका करत सातारा संस्थानासह कोल्हापूर, औंध, पुणे आणि मिरज संस्थानांच्या नोंदींवर आधारित शासन निर्णय (जीआर) काढण्याची मागणी केली. गॅझेटमधील नोंदींनुसार अर्ज करणाऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र आणि त्याची वैधता देण्यात यावी, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. मराठा समाज मोठा होऊ नये अशी काहींची मानसिकता आहे. आम्ही सरकारला भरपूर वेळ दिला, आता आणखी वेळ देणार नाही. संवादातून मार्ग निघाला पाहिजे, मात्र आंदोलन थांबणार नाही, असा इशाराही जरांगे यांनी दिला. तसेच पोलिसांनी कोणत्याही प्रकारच्या लाठीचार्जचा विचार करू नये, अन्यथा त्याचे गंभीर परिणाम होतील, असेही त्यांनी म्हटले.

**सरकारची ५ मोठी आश्वासने**

मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर सरकारने तयार केलेल्या मसुद्यात काही महत्त्वाच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यानुसार मराठा आरक्षण कक्ष पुढील एका महिन्यात सुरू करण्यात येणार.,नोंदी शोधणे, पान ४ वर

## विषारी दारुकांड; २१ अधिकारी निलंबित

### पोलीस व उत्पादन शुल्क विभागात खळबळ

मुंबई/प्रतिनिधी-पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात विषारी दारू प्रकरणामुळे झालेल्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मोठी कारवाई करत तब्बल २१ सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. मध्यरात्री काढण्यात आलेल्या या आदेशामुळे पुणे पोलीस दल आणि राज्य उत्पादन शुल्क विभागात एकच खळबळ उडाली आहे.

गेल्या दोन दिवसांत हडपसर, दापोडी आणि फुगेवाडी परिसरात विषारी दारू प्राशनामुळे १३ जणांचा मृत्यू झाला असून काही जण विविध रुग्णालयांत उपचार घेत आहेत. त्यापैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या घटनेनंतर अवैध दारू विक्री आणि उत्पादनाच्या धंद्यांकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवत प्रशासनाने कठोर पाऊल उचलले आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड पोलीस दलातील ८ पोलीस अधिकारी व कर्मचारी, तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागातील १३ अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी जारी केले आहेत.

## 'खातं काढून घ्यावं लागेल'च्या चर्चेने राजकारण तापलं

### पार्थ पवार-छगन भुजबळांनी चर्चा फेटाळली



मुंबई/प्रतिनिधी- अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या एका वाहतूक टेंडरच्या संदर्भात राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि खा.पार्थ पवार यांच्यात तीव्र शाब्दिक चकमक झाली आणि त्यानंतर तर तुमचे खाते काढून घ्यावे लागेल असा दम पार्थ पवारांनी भुजबळांना दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. या चर्चांना पार्थ पवार आणि छगन भुजबळ यांनी स्पष्ट शब्दांत फेटाळली आहे.

राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यस्तरीय वाहतूक टेंडर एका विशिष्ट ठेकेदाराला देण्याबाबत पार्थ पवार यांनी संबंधित ठेकेदाराला मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे पाठविल्याची चर्चा होती. मात्र, नियम आणि प्रक्रियेचा दाखला देत भुजबळ यांनी टेंडर देण्यास नकार दिल्याचे सांगितले जाते. याच मुद्यावरून दोघांमध्ये मतभेद निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली.काही वृत्तांमध्ये असा दावा करण्यात आला की, यावेळी भुजबळ यांनी पार्थ पवार यांना, तुमच्या वडिलांनी किंवा आजोबांनीही मला कधी अशा पद्धतीने सांगितले नव्हते, अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली. त्यावर पार्थ पवार यांनी, मला तुमच्याकडचा विभाग काढून घ्यावा लागेल, अशी प्रतिक्रिया दिल्याचे सांगितले जात आहे.या कथित घटनेची चर्चा रंगत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसमधील ज्येष्ठ आणि युवा नेतृत्वातील संबंधांबाबत नव्याने प्रश्न उपस्थित होऊ लागले. यापूर्वीही पक्षातील काही वरिष्ठ नेते आणि तरुण नेतृत्वामध्ये पान २ वर

## अस्तित्वात नसलेल्या शिवकृपा कृषी सेवा केंद्रावर कारवाई;कृषी विभागाच्या कारभारावर संशय

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील सात कृषी सेवा केंद्रांचे खत विक्री परवाने सहा महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहेत. मात्र या कारवाईत समाविष्ट असलेल्या शिवकृपा कृषी सेवा केंद्र प्रकरणामुळे कृषी विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ज्या ठिकाणी शिवकृपा कृषी सेवा केंद्र असल्याची नोंद आहे, त्या ठिकाणी सध्या कैलास फर्टीलायझर्स या नावाने व्यवसाय सुरू आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शिवकृपा कृषी सेवा केंद्र कुठे कार्यरत आहे, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे अस्तित्वाबाबत प्रश्न असलेल्या केंद्रावरच कारवाई झाल्याने हे प्रकरण अधिकच गूढ बनले आहे.कृषी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार संबंधित केंद्र नरसी येथे स्थलांतरित झाले आहे. मात्र स्थलांतराची परवानगी, नोंदी आणि पडताळणीबाबत स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.दरम्यान, शेतकरी व नागरिकांमध्ये शिवकृपा कृषी सेवा केंद्राशी संबंधित नांदेड जिल्ह्यात मोठे सिंडिकेट कार्यरत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. पान ४ वर

## वादळी पावसाचे बिहारमध्ये १२ बळी


### २४ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

पटणा: बिहार राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाने कहर माजवला आहे. या दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी वीज कोसळून १२ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन भारतीय हवामान विभागाने राज्यातील २४ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

बिहारमध्ये गेल्या काही दिवसांपासून हवामानात मोठा बदल झाला असून मुसळधार पाऊस, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तीव्र उष्णतेमुळे हैराण झालेल्या बिहारवासीयांना पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला असून राज्यातील तापमानात सुमारे ८ अंश सेल्सिअसने घट झाली आहे. राजधानी पटणासह दक्षिण बिहार आणि उत्तर बिहारच्या पश्चिम भागातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस व ताशी ५० ते ६० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसासह विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे. तसेच पश्चिम चंपारण, पूर्व चंपारण, गोपालगंज, सिवान, सारण, नालंदा, जहानाबाद, नवादा, गया, लखीसराय, शेखपुरा, जमुई, मुंगेर, बांका, खगडिया आणि भागलपूर जिल्ह्यांमध्येही जोरदार पाऊस पडण्याचा पान ४ वर

## आ.बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त राहुल देशपांडे यांची संगीत संध्या





नांदेड/प्रतिनिधी-नांदेड उत्तर विधानसभा मतदार-संघाचे लोकप्रिय आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त १ जून रोजी सायं.७ वा. ए.के. संभाजी मंगल कार्यालय नांदेड येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांची संगीत संध्या आयोजित करण्यात आली आहे.

जनतेच्या हितासाठी सदैव तत्पर असणारे आणि नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात विकासाची असंख्य कामे करून लोकांना खरा दिलासा देणारे लोकनायक आ. बालाजीराव कल्याणकर यांचा वाढदिवस १ जून रोजी याही वर्षी विविध सामाजिक कार्यक्रमाने आणि धार्मिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त सकाळी दहा वाजता मरळक येथे सकाळी दहा वाजता हरिभक्त परायण विशाल महाराज खोले यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून याचवेळी नांदेड उत्तर विधानसभा मतदार-संघातील जनतेसाठी भव्य मोफत आरोग्य शिबिर ही आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांच्या संगीत संध्या या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ए.के संभाजी मंगल कार्यालयात सायंकाळी सात वाजता संगीत रजनीचा कार्यक्रम रंगणार आहे. तत्पूरी सायंकाळी पाच वाजता आ.बालाजीराव कल्याणकर ए.के.संभाजी मंगल कार्यालयात जनतेच्या गाठीभेटी घेतील. आयोजित करण्यात आलेल्या संगीत संध्या कार्यक्रमाला आणि मरळक येथे आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सोहळा आणि आरोग्य शिबिराला आणि अभिष्टचिंतन सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे यांनी केले आहे.

## एका कर्जासाठी दोन जमिनी गहाण?;जिल्हा बँकेच्या 'डबल बोजा'कारनाम्याने खळबळ

### मूल्यांकनापेक्षा जास्त कर्ज मंजूर;बंद पडलेल्या जिनिंग संस्थेला कोट्यवधींचा लाभ?

सरफराज दोसानी

माहूर:माहूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जमिनीवर उभारण्यात आलेल्या सह्याद्री जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्थेच्या प्रकरणात आता गंभीर आर्थिक व कायदेशीर अनियमिततेचा संशय व्यक्त केला जात आहे. एका कर्जासाठी दोन वेगवेगळ्या जमिनींवर बोजा दाखविल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गट क्रमांक १ मधील जमिनीवरील तब्बल ११ लाख ९० हजार रुपयांचा कर्जबोजा कायम ठेवण्यात आला असतानाच, दुसरीकडे सह्याद्री जिनिंगच्या गट क्रमांक १९४ मधील एक एकर जमिनीवर तब्बल ७१ लाख ४० हजार रुपयांचे कर्ज दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे एकच कर्ज आणि दोन जमिनी गहाण असा अभूतपूर्व प्रकार उघडकीस आला असून, महसूल व सहकार विभागात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, ज्या सह्याद्री जिनिंग प्रेसिंग संस्थेचा कारखाना अनेक वर्षांपासून बंद व पडकी अवस्थेत आहे, त्या संस्थेला एवढे मोठे कर्ज कोणत्या निकषांवर देण्यात आले, हा सर्वात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. २०२४ मध्ये संबंधित एक एकर जमिनीचे शासकीय मूल्यांकन अवघे ३९ लाख रुपये असताना त्यावर ७१.४० लाखांचे कर्ज मंजूर करण्यात आल्याने हा व्यवहार बँकिंग नियमांच्या विरोधात असल्याची चर्चा आहे. २०२६ मध्येही त्या जमिनीचे मूल्यांकन केवळ ६० लाखांच्या आसपास असल्याचे सांगितले जात आहे.

दि.४ नोव्हेंबर २०२४ रोजी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व्यवस्थापकांनी महसूल विभागाला पत्र देत गट क्रमांक १९४ वरील जमिनीवर कर्जाचा बोजा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली. मात्र हे पत्र कोणत्या आर्थिक अहवालाच्या आणि कोणत्या तारण मूल्यांकनाच्या आधारावर देण्यात आले, याबाबत आता संशय व्यक्त केला जात आहे. सन १९९४ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची तब्बल १ हेक्टर २१ आर जमीन सह्याद्री जिनिंग प्रेसिंग संस्थेला केवळ २ हजार रुपये वार्षिक भाड्याने देण्यात आली होती. २८ वर्षांची मुदत २०२२ मध्ये संपल्यानंतरही जागा परत न मिळाल्याने बाजार समितीने अनेकदा पत्रव्यवहार करून जमीन परत मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेच नियमबाह्य कर्ज व्यवहार




रद्द करून जमिनीवरील बोजा कमी करण्यासाठीही पाठपुरावा सुरू होता.या संपूर्ण प्रकरणामुळे बाजार समितीच्या विकास कामांनाही मोठा फटका बसल्याचे समोर आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारणीसाठी तब्बल १ कोटी ५२ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळूनही जागा उपलब्ध नसल्याने पान ४ वर

# दिव्याखाली अंधार?

**संस्कृतीचे माहेरघर, शिक्षणाची राजधानी आणि प्रगत विचारांची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात विषारी दारू प्राशनामुळे १७ जणांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक आहे. समाजाला दिशा देणाऱ्या, प्रबोधनाची परंपरा जपणाऱ्या या शहरात अशा प्रकारची दुर्घटना घडणे म्हणजे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि शासनाच्या नियंत्रण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे करणारे आहे. ही घटना केवळ काही व्यक्तींच्या मृत्यूपुरती मर्यादित नसून संपूर्ण यंत्रणेच्या अपयशाचे भयावह चित्र समोर आणणारी आहे.राज्यात दारूबंदी, उत्पादन शुल्क, पोलीस आणि गृह विभाग अशी अनेक यंत्रणा अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी कार्यरत आहेत. या सर्व विभागांकडे मोठे मनुष्यबळ, अधिकार आणि संसाधने उपलब्ध आहेत. तरीही पुण्यासारख्या शहरात सर्रास भेसळयुक्त देशी दारूची विक्री होत राहते आणि त्याचा मागमूस प्रशासनाला लागत नाही, हे सर्वसामान्य नागरिकांच्या आकलनापलीकडचे आहे. अशा प्रकारचा अवैध व्यवसाय दीर्घकाळ सुरू राहण्यासाठी केवळ गुन्हेगारांचे धाडस पुरेसे नसते; त्यामागे कुठे ना कुठे राजकीय संरक्षण, स्थानिक पातळीवरील संगनमत किँवा प्रशासनाची जाणीवपूर्वक दुर्लक्षाची भूमिका असण्याची शक्यता नाकारता येत नाही.विषारी दारूमुळे झालेल्या मृत्यूंनंतर राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन मृतांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि संबंधित दारू विक्री केंद्राविरोधात आंदोलन केले. त्यांच्या या भूमिकेमुळे पुन्हा एकदा प्रशासनाच्या निष्क्रियतेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मात्र अशा घटना घडल्यानंतर विरोधकांनी आवाज उठवणे आणि सत्ताधाऱ्यांनी चौकशी व कारवाईची घोषणा करणे, हे एक ठरलेले चक्र बनले आहे. प्रश्न असा आहे की, प्रत्येक वेळी निरपराध नागरिकांचे बळी गेल्यानंतरच शासनाला जाग का येते? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. दोषींना शिक्षा होणे आवश्यकच आहे; परंतु केवळ कारवाईच्या घोषणा करून शासनाची जबाबदारी संपत नाही. वास्तविक, अशा घटना घडण्यापूर्वी त्यांना प्रतिबंध करणे हीच प्रशासनाची खरी कसोटी असते. अवैध मद्यनिर्मिती आणि विक्री ही एका दिवसात उभी राहत नाही. त्यासाठी पुरवठा साखळी, वितरण यंत्रणा आणि ग्राहकांचे जाळे तयार होते. या सर्व हालचाली प्रशासनाच्या नजरेआड राहणे अशक्यप्राय आहे. त्यामुळे या दुर्घटनेची चौकशी केवळ विक्रेत्यांपुरती मर्यादित न राहता संबंधित विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे.या घटनेने आणखी एक गंभीर वास्तव समोर आणले आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक स्वस्त देशी दारूकडे आकर्षित होतात आणि त्याचाच फायदा घेत भेसळयुक्त मद्याचा काळाबाजार फोफावतो. त्यामुळे कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याबरोबरच जनजागृती, व्यसनमुक्ती अभियान आणि पर्यायी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावरही शासनाने भर दिला पाहिजे. अन्यथा अशा दुर्घटना पुन्हा पुन्हा घडत राहतील.पुण्यातील ही घटना राज्य प्रशासनासाठी एक इशारा आहे. नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. जर विषारी दारूचा व्यापार प्रशासनाच्या नाकाखाली सुरू राहणार असेल, तर कठोर कारवाई ही केवळ औपचारिक घोषणा ठरेल. या प्रकरणात दोषींना शिक्षा मिळालीच पाहिजे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे अशा बेकायदेशीर धंद्यांना संरक्षण देणाऱ्या किँवा दुर्लक्ष करणाऱ्या संपूर्ण साखळीचा पर्दाफाश झाला पाहिजे.पुण्यासारख्या प्रगत शहरात जर विषारी दारूमुळे नागरिकांना जीव गमवावा लागत असेल, तर ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची समस्या नाही, तर प्रशासनाच्या उत्तरदायित्वावरचा गंभीर आघात आहे. दिव्याखाली अंधार असू नये, अशी अपेक्षा असते; पण पुण्यात घडलेल्या या दुर्दैवी घटनेने नेमके उलटे चित्र उभे केले आहे. आता तरी शासनाने केवळ प्रतिक्रिया न देता ठोस, पारदर्शक आणि परिणामकारक कृती करून नागरिकांचा विश्वास पुन्हा मिळवणे आवश्यक आहे.**

> गांधी राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. गिरीशसिंह पटेल हे उद्या दि.३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त हा लेख प्रकाशित करीत आहोत.
> - *संपादक*

# बत्तीस वर्षाच्या अध्यापन सेवेनंतर मुख्यध्यापक डॉ.गिरीशसिंह पटेल सेवानिवृत्त!

स.रविन्द्रसिंघ मोदी
वरिष्ठ पत्रकार,नांदेड.

शहरातील सर्वात जूनी हिंदी भाषा प्रचार संस्था गांधी राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ गिरीशसिंह बालाजीसिंह पटेल आपल्या प्रदीर्घ अध्यापन सेवेतून आता सेवानिवृत्त होत आहेत. हिंदी भाषेत अध्यापन कार्यासोबतच हिंदीचे प्रचार-प्रसार करण्यात त्यांनी जवळपास तीन दशकँ वाहिली. हिंदी साहित्य निर्माण व्हावे व साहित्यिकांना मंच मिळवून देण्यासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केलेत. त्यांच्या सोबत मला स्वतःला अनेक उपक्रमात सहभागी होता आले म्हणून त्यांनी केलेल्या परिश्रमाची मला जाणीव आहे.

दि. २० मे, १९६८ रोजी गिरीशसिंह पटेल यांचा जन्म शहरातील गाडीपुरा भागात झाले होते. त्यांचे वडील श्री बालाजी सिंह पटेल हे स्वतः अध्यापक आणि मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. गांधी राष्ट्रीय हिंदी विद्यालय गाडीपुरा येथून सन १९८३ मध्ये त्यांनी दहावी बॉर्डाची परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण केली. नंतर त्यांनी डी.एड., बी.एड., बी.ए., एम.ए.हिंदी, पोलिटेक्निक सारख्या पदव्या मिळवल्या. त्यांना विद्यार्थी दशेत गांधी राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे तत्कालीन मुख्यध्यापक स्व. काशीनाथराव बोर्डे यांचे मार्गदर्शन लाभले त्यामुळे शिक्षणाविषयी त्यांच्या जीवनात गंभीरता निर्माण झाली. पुढे चालून श्री दुर्गादास बोर्डे यांच्या मार्गदर्शनात त्यांनी डी. एड. अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांनी तरुण अवस्थेत प्रा. डॉ नरसिंह प्रसाद दुबे (उदगीर) यांच्या मार्गदर्शनात नांदेड जिले के उत्तर भारतीय लोकगीतों का अध्यन्न विषयात हिंदी भाषेतून विद्यावाचस्पति (डॉक्टरेट) मिळवून आपल्या कुटुंबाचे आणि समाजाचे नावलौकिक केले.

सुरुवातीला डॉ गिरीशसिंह पटेल हे सहायक अध्यापक पदावर रुजु झाले. नंतर जवळपास दहा वर्षे अध्यापक म्हणून गांधी राष्ट्रीय विद्यालयात सेवेत कार्यरत राहिलेत. पण नंतर अचानकपणे संधी चालून आली आणि त्यांना संस्थेने प्राथमिक विभागात मुख्याध्यापक पदाची जवाबदारी सुपुर्द केली. त्यावेळी इंग्रजीच्या वाढत्या प्रभावाखाली मराठी माध्यम आणि हिंदी माध्यमाच्या शाळेकडे विद्यार्थी आणि पालक पाठ फिरवत होते. अशा वेळी त्यांनी परिश्रम करुन शाळेत विद्यार्थीप्रवाह यथावत ठेवलं म्हणायला हरकत नाही. त्यांनी पहिल्यांदाच विद्यार्थियाँसाठी परिवहन सेवा शाळेतर्फे लागु केली. त्यामुळे विविध भागातून आणि दुरुन विद्यार्थी शाळेत येऊ लागले. त्यांनी आपल्या सहकारी शिक्षकाँसोबत विश्वासचे नाते कायम केले. त्यामुळे शाळेचे संचालन आणि शिक्षणाचा दर्जा चांगला राहिला. त्यांच्या पाठपुराव्यानेच तत्कालीन खासदार मा. श्री भास्कररावजी पाटिल खतगावकर यांच्या खासदार निधीतून अल्पसंख्याँक योजनेन्तरगत २५ लक्ष रुपायाँचा निधी शाळेला प्राप्त झाला. त्या निधीतून शालेय वर्गांचे बांधकाम पूर्ण करुन घेण्यात आले.



तत्पुर्वी त्यांनी शालेय मार्फत वर्ष १९९६ ते २०१६ पर्यन्त नांदेड़ शहर अंतरशालेय स्पर्धांचे आयोजन केले. त्या स्पर्धांना मोठे यश लाभले होते. या व्यतरिक्त त्यांनी वर्ष १९९७ पासून हिंदी सदभावना रैली कार्यक्रमाची सुरुवात केली आणि सतत तीस वर्षापासून हे उपक्रम सुरु आहे. वर्ष २०१५ मध्ये त्यांच्या पुढाकाराने शाळेत राष्ट्रीय बाल साहित्य सम्मेलन कार्यक्रम राष्ट्रीयस्तरावर घेण्यात आला होता आणि तो संस्मरणीय ठरला. हजुरसाहिब साहित्य सम्मेलनात ते शीर्ष पदाधिकारी म्हणून सक्रिय राहिले आणि त्यांच्या मार्फ़त साहित्य सम्मेलन व भाषण कार्यक्रमाँचे आयोजन झाले.वर्ष २०२२-२३ मध्ये बालभारती पाठ्यक्रम निर्मिति समिती सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. मुंबई हिंदी विद्यापीठाचे दहा वर्षे प्रकाशन मंत्री, परीक्षा अध्यक्ष व नंतर कार्यकारिणी सदस्य म्हणून त्यांची सेवा सुरु आहे. तसेच वर्ष २०२३ मध्ये त्यांना गांधी राष्ट्रीय हिंदी विद्यालय या संस्थाचे जनरल बॉडी सदस्य म्हणून नियुक्ती मिळालेली आहे.म्हणून सेवानिवृत्ति नंतर ही संस्थेची आणि हिंदी भाषेची सेवा यथावत करतील यात शंका नाही. त्यांनी मुख्याध्यापक म्हणून सतत २२ वर्षे सेवा वाहिली आहे त्याचे दाण्डगे अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. त्यांच्या सेवानिवृत्ती वेळी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी व चांगल्या आरोग्य आबाधित राहावे यासाठी शुभेच्छा देतो.

# सावधान! तंबाखू,खैनी,गुटखा,खर्रा खाने "घातकच" परंतु खावुन थुंकणे "महाघातक"

रमेश लांजेवार
नागपूर.

संपूर्ण जगातील लोकांना तंबाखू पासून मुक्ती मिळावी व आरोग्य सुदृढ रहावे या उद्देशाने तंबाखू व धुम्रपान यापासून होणारा त्रास दुर करण्याकरीता तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.जागतिक आरोग्य संघटना डब्लुएचओच्या सदस्य देशांनी तंबाखू सेवनाने होणाऱ्या बिमारीचा मृत्यू दरात वाढ झाल्यामुळे १९८७ ला महामारी घोषीत करण्यात आली व तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा सल्ला देण्यात आला.८ एप्रिल १९८८ ला डब्लुएचओने वर्षगाठ साजरी केली व याच दिवशी ३१ मे तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो. डब्लुएचओने तंबाखू सेवनाने होणाऱ्या २५ प्रकारच्या शारीरिक बिमाऱ्या पहाता व ४० प्रकारचे कैंसर पहाता आणि या बिमारीचा वाढता मृत्यू दर पहाता याला महामारी घोषित केली.डब्लुएचओच्या माहिती नुसार जगात तंबाखूने किँवा धुम्रपान केल्याने दरवर्षी ८० लाखांपेक्षा जास्त लोकांना आपले प्राण गमवावे लागतात.यावर जगातील देशांनी नियंत्रण ठेवले नाही तर मृत्यूचा आकडा दुप्पटीने वाढु शकतो. कोणत्याही नशेली पदार्थाचे अती सेवन करणे म्हणजे मृत्यूला कवटाळने होय.

मानवाची जगण्याची दशा,दीशा ठरवीने हे मानवाच्या मनावर व हातामध्ये असते. परंतु आपल्या मनावरचा ताबा सोडून नशेली पदार्थाचे सेवन केले तर स्वत:ला व परिवाराला घातक सीध्द होवु शकते याला नाकारता येत नाही. तंबाखूच्या सेवनाने कॅन्सर सारखे महाभयानक आजाराने मानुस जखडतो आणि यांचा दुषपरीणाम संपूर्ण परीवाराला भोगावा लागतो.ह्याबाबी मानवाने स्वतः समजुन घ्यायला हव्यात.कोणत्याही नशेच्या बाबतीत सरकारचे दुटप्पी धोरण आपल्याला पहायला मिळते.सरकार नशेली वस्तुची खुलेआम विक्री करण्यास प्राधान्य देते व मोठ्या प्रमाणात परवाने सुध्दा देते, जाहिराती लावते आणि दुसरीकडे नशा न करण्याचे आव्हान करते याला कोणते धोरण म्हणावे? मध्यंतरी महाराष्ट्रत दारू-वाईन किराणा दुकान विक्रीला ठेवता येईल या चर्चेला मोठे उधाण आले होते.या चर्चेचा सर्वच स्तरातून निषेध करण्यात आला. त्यामुळे ताबडतोबच या चर्चेवर पुर्णविराम लागला. सरकारने नशाबंदीचे मोठ-मोठे सरकारी ऑफिसेस खोललेली आहेत. याकरीता देशभरात लाखो कर्मचारी कार्यरत असतात. याव्यतीरीक्त अनेक रजिस्टर्ड सामाजिक संस्था व्यसनमुक्तीसाठी कार्य करतांना दीसतात.परंतु सरकार स्वत:हुन नशेली पदार्थाचे उत्पादन बंद करायला तयार नाही. कारण नशेली(मद्द,तंबाखू, खैनी, सिगारेट,बिडी, गुटखा,गांजा इत्यादी) वस्तुपासुन राज्य व केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल (रेव्हेन्यू) मिळत असतो व त्यावर सरकारचा कारभार चालतो.यावरून स्पष्ट होते की सरकार पैसा कमविण्याकरीता दुटप्पी धोरण अवलंबुन मानवाचा जीव धोक्यात टाकत आहे. कोव्हीड-१९ च्या महामारीच्या काळात संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये लॉकडाउन होता याकाळात दारूची दुकाने खोलण्याची मागणी सर्व प्रथम राजकीय पुढाऱ्यांची




होती आणि अनेक राज्यांमध्ये लॉकडाउनच्या काळात दारूची दुकाने खोलण्यात आली.यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल रूपात पैसा जमा झाला.यावरून स्पष्ट होते की पैशासाठी सरकार लोकांना व्यसनाधीन करीत आहे. लॉकडाउनच्या काळात दारू, सिगारेट, बीडी,तंबाखू, खैनी, गुटखा,खर्रा,गांजा याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होता ह्या वस्तु अवैधरीत्या दुप्पटीने किँवा तिपटीने लोकांनी घेतल्या परंतु नशासोडण्याला कोणीही महत्त्व दिले नाही. लॉकडाउनच्या काळात लोकांना नशा सोडण्याची सुवर्णसंधी होती.परंतु नशेली वस्तुंची दुकाने खुलताक्षणी सोशल डिस्टिंक्शनची धज्जीया उडवून नशेली वस्तु घेण्याकरिता ३ कीलो मिटर पर्यंत लोक रांगेत उभे होते.अशाने कोणत्याही नशेवर आळा बसणार नाही.प्रत्येकानी जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणीही नशेच्या आहारी जावु शकत नाही.कोणतीही नशा असो ती घातकच असते. परंतु अती नशा मृत्यूच्या खाईत नेल्या शिवाय रहाणार नाही. याला म्हणतातअती तिथे माती. त्यामुळे कोणतीही नशा करतांना सावधगिरी बाळगली पाहिजे.अन्यथा जिवीत हानी अटळ आहे. तंबाखू, गुटखा,खैनी,खर्रा, सुपारी, दारू यापासून शरीराच्या कोणत्याही अवयवांच्या विकासासाठी चालना देत नाही मग या वस्तूचे सेवन का करावे? कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला छल्ली व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. उदाहरण द्यायचे झाले तर बादाम १००० रूपये किलो यांच्या तुलनेत गुटखा ४४०० रूपये किलो, शुद्ध तुप ६०० रूपये किलो यांच्या तुलनेत तंबाखू १७०० रूपये किलो, सफरचंद १०० रूपये किलो यांच्या तुलनेत सुपारी ६०० रूपये किलो, दुध ५० रूपये लिटर यांच्या तुलनेत दारू ६०० रूपये लिटर अशा प्रकारे अशा अनेक पोष्टीक वस्तू आहेत की त्यांची किँमत नषेली वस्तू पेक्षा कितीतरी पटीने स्वस्त व कमी आहेत.परंतु नशा करणारे बहाद्दर नशेला जास्त महत्त्व देतात हे त्यांचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.कोव्हीड-१९ च्या महामारी पासून सरकारने रस्त्यावर थुंकण्यावर बंदी घातली होती त्याचप्रमाणे सरकारने तंबाखू, गुटखा,खैनी, खर्रा,गांजा यावर सुध्दा बंदी घालायला पाहिजे होती.यामुळे मृत्यू दर कमी होण्यास मोठी मदत होईल. करोना काळात कोरोना महामारीचा प्रकोप दीवसेंदीवस वाढत असतानाच केंद्रशासित प्रदेशासह २८ राज्यांनी तंबाखू व धुम्रपानामुळे कोरोणाची लागन होण्याची शक्यता पहाता. त्यातच फुफ्फुसाचा कर्करोग होतो किँवा रोगप्रतिकारक शक्ती कमी होते असे आरोग्य तज्ञांचे म्हटले होते.या पार्श्वभूमीवर तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा सेवन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालने उचीत होते तीच पद्धत नेहमीसाठी सरकार कडून अमलात यायला हवी. सध्याच्या परीस्थितीत युवापिढी धुम्रपानाच्याआहारी जातांना दिसत आहे.त्यांनी मनावर ताबा ठेवुन धुम्रपानाचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन धुम्रपानाचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे मृत्यूच्या रांगेतउभे रहाल्यासारखे आहे.याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.सरकारने कीतीही नशेली वस्तु विकण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्श सुध्दा करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कोणीही रस्त्यावर तंबाखू,खर्रा किँवा इतर नशेली वस्तू थुंकु नये याची काळजी घ्यायला हवी.कारण रस्त्यावर थुंकल्याने अनेक आजार व संक्रमनात मोठ्या प्रमाणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येऊ शकते.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील त्याचप्रमाणे आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल. त्यामुळे तंबाखू खर्रा खावुन रस्त्यावर थुंकु नका व कोणत्याही महामारीला जाहीर आमंत्रण देवु नका ही माझी आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे.याकरीता तंबाखू निषेध दिनाच्या निमित्ताने आपणसंकल्पकरूया की यानंतर धुम्रपान व इतर नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या. सुखी संसाराला उध्वस्त करणारी तंबाकुआणि व्यसनाची मैत्री नका स्वीकारू, मूल्य जीवनाचे जाणून व्यसनाला दूर सारू, नका त्या नशेला भारु,सदा रहा सुखी संसाराचे धनी, आनंद लुटूनि परिवारजनी,करू समाजाला व देशाला व्यसन मुक्त हाच आमचा संकल्प. जय हिंद.

# अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी

नायगाव/प्रतिनिधी-महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करून आरक्षणापासून वंचित राहिलेल्या जातींना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात अनुसूचित जातींना शिक्षण व नोकरीमध्ये १३ टक्के आरक्षण असून या प्रवर्गात ५९ जातींचा समावेश आहे. मात्र, आरक्षणाचा लाभ केवळ काही मोजक्याच जातींना मोठ्या प्रमाणात मिळत असून सुमारे ५७ जाती या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. पंजाब, आंध्रप्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, हरियाणा व कर्नाटक या राज्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ च्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्रात काही लोक सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात वक्तव्य करून संभ्रम निर्माण करीत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. निवेदनानुसार, माजी न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने १६ एप्रिल रोजी शासनाला अहवाल सादर केला असून त्यावरील हरकतींची मुदत ३० एप्रिल रोजी संपली आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ कायदा करून उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नायगाव येथे खा. श्रीकांत शिंदे यांच्याकडेही निवेदनाची प्रत देण्यात आली. यावेळी निवेदन देताना रावसाहेब पवार, गणपत रेड्डी, रवींद्र भालेराव, भीमराव बैलके, एकनाथ वाघमारे, आर.एम. सूर्यवंशी, ॲड.बी.एम वाघमारे, संभाजीराव शेळके, प्रमोद केसराळीकर, मल्हारी तोटरे, रामेश्वर गायकवाड, संग्राम निवृत्ती बेलकर, नगरसेवक दयानंद भालेराव यासह अनेक जणांची उपस्थिती होती.

पान १ वरुन

## 'खातं काढून घ्यावं लागेल'च्या चर्चेने...

मतभेद असल्याच्या चर्चा समोर आल्या होत्या. त्यामुळे या नव्या वादाच्या चर्चेने राजकीय वातावरण आणखी तापले. दरम्यान, छगन भुजबळ यांनी या सर्व चर्चांवर प्रतिक्रिया देताना, आमच्यात कोणतीही वादावादी झालेली नाही. काही गोष्टी समजुतीने आणि चर्चेतून सोडवाव्या लागतात. त्याचा अर्थ वाद झाला असा होत नाही, असे स्पष्ट केले.दुसरीकडे, पार्थ पवार यांनीही आपल्याविषयी जाणीवपूर्वक चुकीच्या बातम्या पसरवल्या जात असल्याचा आरोप केला आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# अबचलनगर-यात्री निवास चौक रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

## तात्काळ चौकशी करुन काम पूर्ण करण्याची प्रशासनाकडे मागणी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील गुरुद्वारा परिसरातील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या अबचलनगर-यात्री निवास चौक रस्त्याच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात विलंब होत असून ड्रेनेज लाईनचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना लेखी निवेदन देण्यात आले असून संबंधित कामाची उच्चस्तरीय चौकशी करून तात्काळ योग्य कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अबचलनगर ते यात्री निवास चौक हा रस्ता गुरुद्वारा परिसरातील वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग मानला जातो. या मार्गावरून दररोज हजारो स्थानिक नागरिक, व्यापारी, विद्यार्थी, रुग्ण तसेच देशभरातून येणारे यात्रेकरू प्रवास करतात. सदर रस्ता खोदून नवीन काँक्रीट रस्ता व ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र मागील अनेक महिन्यांपासून काम संथ गतीने सुरू असल्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.स्थानिक नागरिकांनी आरोप केला आहे की, टाकण्यात आलेली नवीन ड्रेनेज लाईन अनेक ठिकाणी योग्य प्रकारे कार्यरत नसून वारंवार चोकअप होत आहे. त्यामुळे सांडपाणी वाहून जाण्यास अडथळे निर्माण होत असून परिसरात अस्वच्छता वाढत आहे. विशेषतः पावसाळा तोंडावर असताना ही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या परिसरामध्ये दशमेश हॉस्पिटल, गुरुग्रंथ साहिब भवन, खालसा हायस्कूल तसेच इतर महत्त्वाच्या संस्था असून शेकडो विद्यार्थी, रुग्ण आणि नागरिक या मार्गाचा नियमित वापर करतात. रस्त्याचे काम अपूर्ण राहिल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली असून नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. धुळीचे प्रमाण, चिखल, खड्डे आणि उघडी ड्रेनेज लाईन यामुळे अपघाताची शक्यता वाढली असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. संबंधित कंत्राटदार व प्रशासनाकडून कामाची गुणवत्ता योग्य प्रकारे तपासली जात नसल्याने कामामध्ये निष्काळजीपणा दिसून येत आहे. अनेक वेळा तोंडी तक्रारी करूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही. त्यामुळे अखेर नागरिकांनी एकत्र येऊन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अधिकृत लेखी तक्रार दाखल केली आहे. लवकरात लवकर योग्य कारवाई न झाल्यास पुढील काळात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी प्रशासनाला दिला आहे. सदर निवेदनावर स. जगदीपसिंघ नंबरदार, गुरबचनसिंघ कारागीर, हंसराजसिंघ सपुरे, हरभजनसिंघ पुजारी, काश्मीरसिंघ कारागीर,



भागसिंघ रिसलदार, बचनसिंघ सरदार, जी. व्ही. कुलकर्णी यांच्यासह अन्य नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पो.नि.साहेबराव गुट्टे यांची पदोन्नती

नांदेड/प्रतिनिधी-पोलीस निरिक्षक साहेबराव गुट्टे यांची पोलीस उपअधीक्षक पदावर पदोन्नती झाली आहे. शुक्रवारी गृह विभागाने राज्यातील पोलीस निरिक्षकांच्या पदोन्नतीचे आदेश काढले आहेत.

पो.नि.साहेबराव गुट्टे प्रदिर्घ सेवेनंतर दि.३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. सेवानिवृत्तीला दोन दिवस बाकी असतांना पोलीस उपअधीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली. पोलीस मुख्यालयातील गृह पोलीस उपअधीक्षकपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुट्टे यांची पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे मित्र परिवाराकडून अभिनंदन होत आहे.



स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी सराईत गुन्हेगार शाहरुख युसुफ सौदागर यास अटक केली असून त्याच्या जवळून चोरीच्या घटनेतील अडीच लाख रुपये किंमतीच्या पाच दुचाकी जप्त केल्या आहेत.

## भाजपा किसान मोर्चाच्या जिल्हा चिटणीसपदी उद्धवराव मुंडे

किनवट/प्रतिनिधी-भारतीय जनता पक्षाच्या किसान मोर्चा नांदेड उत्तरचे जिल्हा चिटणीसपदी उद्धवराव मारोतराव मुंडे यांची नियुक्ती केल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. त्याच्या नियुक्तीमुळे शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीतील ज्वारी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांच्या खरेदीविषयक समस्या मार्गी लागणार असल्याचा विश्वास बहूतांश शेतकऱ्यांनी व्यक्तविला आहे.



उद्धवराव मुंडे हे सदन शेतकरी असून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी नेहमीच ते संघर्ष करताना दिसतात. त्यांच्या कार्याची दखल घेत भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने उशिरा का होईना परंतु जिल्हा चिटणीसपदाची त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आल्याने शेतकऱ्यांसह सर्व स्तरातून त्यांच्या नियुक्तीचे स्वागत होतांना दिसते. भाजपा किसान मोर्चा नांदेड उत्तरचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर गणपतराव कदम देळूबकर यांनी २७ मे रोजी नियुक्ती केली आहे. नियुक्तीनंतर किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आ. भीमराव केराम, भाजपा पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी आणि बहूतांश शेतकऱ्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. उल्लेखनीय म्हणजे किनवट तालुक्यातील ज्वारी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांच्या भरडधान्य खरेदीचा प्रश्न सद्या ऐरणीवर आला आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक व्यवस्थापक किनवट कार्यालयाच्या अधिपत्याखाली इस्लापूर येथे खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. मध्येच शेतकरी आणि व्यापाऱ्यांचा मुद्दा समोर आला आहे. यातील तथ्यता जाणून घेऊन शेतकऱ्यांच्या शेतीमालाला प्राधान्यक्रम देण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे. शेतकरी आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून उद्धवराव मुंडे यांच्याकडे पाहिले जात आहे.

## होट्टलमध्ये थातुरमातूर काम करुन बिल उचलण्याचा खटाटोप

देगलूर/प्रतिनिधी-मौजे होट्टल येथे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे बांधकाम अवघ्या चार ते पाच दिवसांतच झालेल्या बांधकामाला रंगरंगोटी करून योजनेचा नाव लिहून बिले उचलण्याचे घाई सुरु आहे. या कामाबद्ल ग्रामस्थांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. बांधकाम पूर्ण होताच फोटो काढून बिले मंजुरीसाठी पंचायत समितीकडे सादर करण्यात आल्याची चर्चा गावात रंगली आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, बांधकामाच्या गुणवत्तेची योग्य तपासणी होण्यापूर्वीच बिले काढण्याची घाई करण्यात येत असल्याने निधीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामपंचायतीतील अनेक विकासकामांबाबत यापूर्वीही ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली असून काही कामे निकृष्ट दर्जाची व बोगस स्वरूपाची असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, महिन्यात कधीतरी ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहणारे संबंधित ग्रामसेवक मात्र बिले काढण्याच्या प्रक्रियेत अत्यंत तत्परता दाखवत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासह गावातील इतर विकासकामांचीही स्वतंत्र तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली आहे. कामांची प्रत्यक्ष पाहणी, खर्चाचा तपशील, मोजमाप पुस्तिका (एम.बी.) तसेच मंजूर अंदाजपत्रकाची तपासणी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी जोर धरत आहे. होट्टलमधील कथित बोगस कामांची चौकशी कधी होणार? असा सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात असून संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची मागणी होत आहे.

## माहूरमध्ये बकरी ईद उत्साहात साजरी

माहूर/प्रतिनिधी-माहूर शहरात बकरी ईद अर्थात ईद-उल-अधा मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. मुस्लिम बांधवांनी सकाळी सामूहिक नमाज पठण करत शांतता, बंधुभाव आणि देशाच्या प्रगतीसाठी प्रार्थना केली. यावेळी सामाजिक सलोखा आणि परस्पर आदराचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. हिंदू आणि मुस्लिम समाजाने एकमेकांना सणाच्या शुभेच्छा देत ऐक्याचा संदेश दिला.

ईदगाह येथे (दि.२८) रोजी सकाळी शहरातील मुस्लिम बांधव पारंपरिक पोशाखात मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यावेळी सर्वांनी सामूहिक नमाज अदा केली. नमाजनंतर देशात शांतता, समृद्धी आणि बंधुभाव टिकून राहावा यासाठी विशेष दुआ करण्यात आली. नमाज संपन्न झाल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. बकरी ईद हा सण त्याग, समर्पण आणि मानवी मूल्यांची जपणूक करण्याचा



संदेश देतो. समाजात शांतता आणि एकोपा टिकवून ठेवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. संतांच्या भूमीत आपण राहतो, त्यामुळे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत सामाजिक सलोखा अधिक मजबूत केला पाहिजे, असे आवाहन नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केले. ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके, आनंद पाटील तुपडाळे, प्रशांत भाऊ राठोड यांचे प्रतिनिधी विजय कांबळे तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाण्यात बुडून इसमाचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-नदीच्या पात्रात पोहण्यासाठी गेलेल्या एका इसमाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना नुकतीच धर्माबाद तालुक्यातील सिरजखोड शिवारात घडली आहे.

गुणाजी पांडूरंग निलेवाड (वय ४२) रा.बाळापूर हे सिरजखोड शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रात पोहण्यासाठी गेले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे.

## कंधारच्या दर्शनी भागात डॉ.अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसवा

### ‘संयुक्त ग्रुप’चा आंदोलनाचा इशारा

कंधार/प्रतिनिधी-साहित्यारत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांचा नव्याने होत असलेला पूर्णकृती पुतळा कंधार शहराच्या मुख्य व दर्शनी भागात बसवावा, या मागणीसाठी ‘संयुक्त ग्रुप’च्या वतीने नगर परिषदेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांना निवेदन देण्यात आले.

डॉ.अण्णाभाऊ साठे हे बहुजन समाजाचे प्रेरणास्थान असून त्यांच्या विचारांनी वंचित घटकांना नवी दिशा दिली आहे. त्यांच्या पुतळ्यासाठी शहरात प्रतिष्ठेची व दर्शनी जागा मिळावी, अशी समाज बांधवांची आग्रही मागणी आहे. संयुक्त ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष साईनाथ भगवानराव मळगे यांनी सांगितले की, गेल्या दोन वर्षांपासून आमरण उपोषण, साखळी उपोषण आणि जनआक्रोश मोर्चाच्या माध्यमातून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे.यापूर्वी पुतळ्यासाठी एक जागा निश्चित करण्यात आली होती; मात्र प्रशासनाने त्या ठिकाणी इतर कामे केल्यामुळे जागा बदलली गेली. यामुळे समाजात तीव्र नाराजी पसरली आहे. प्रशासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर साईनाथ मळगे, आनंद वाघमारे, संतोष वाघमारे आणि विजय मोरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पीपल्स कॉलेजच्या प्राचार्यपदी डॉ.विकास सुकाळे यांची नियुक्ती

नांदेड/प्रतिनिधी-पीपल्स कॉलेज येथील प्राचार्य पदाचा पदग्रहण सोहळा महाविद्यालयाच्या आय.सी.टी. हॉलमध्ये शुक्रवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी नवनियुक्त प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी सर्वांच्या उपस्थितीत प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील होते. संस्थेच्या सचिव सौ. श्यामल पत्की, सहसचिव अ‍ॅड. प्रदीप नागापूरकर, प्रभारी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर, सौ. सुधा सुकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात सीए डॉ. प्रवीण पाटील म्हणाले की, पीपल्स कॉलेजच्या प्राचार्य पदाची गौरवशाली परंपरा आहे. महाविद्यालयाच्या इतिहासात प्रथमच अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक प्राचार्यपदी विराजमान झाले आहेत. माजी अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी संस्थेची ध्येय-धोरणे पुढे नेणाऱ्या व्यक्तीची निवड करण्याची जबाबदारी आमच्यावर सोपविली होती. डॉ. विकास सुकाळे यांच्या रूपाने पीपल्स कॉलेजमध्ये विकासपर्वाची सुरुवात होईल, याची खात्री आहे. पीपल्स कॉलेज हे एकेकाळी सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळीचे मराठवाड्यातील केंद्र होते. त्या परंपरेला नवसंजीवनी देण्याची अपेक्षा डॉ. सुकाळे यांच्या नेतृत्वाकडून आहे. संस्थेच्या सचिव सौ. श्यामल पत्की यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, प्राचार्य पद हे सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्वाचे पद आहे. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेची ध्येय-धोरणे आणि सामाजिक जबाबदारी या सर्वांचा विचार करून निर्णय घेणारी व्यक्ती प्राचार्य असावी. डॉ. सुकाळे यांच्या कार्यकाळात महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता निश्चितच अधिक उंचावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी सहसचिव अ‍ॅड. प्रदीप नागापूरकर तसेच प्रभारी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर यांनीही नवनियुक्त प्राचार्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. प्राचार्य पद स्वीकारताना डॉ. विकास सुकाळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, परमपूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी १९५० साली पीपल्स कॉलेजची स्थापना करताना संस्थेची ध्येय-उद्दिष्टे स्पष्ट केली होती. त्या विचारांना पुढे नेण्याचे काम करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न असेल. या कार्यक्रमास दीपनाथ पत्की, प्रा. डॉ. ए.टी. शिंदे, उपप्राचार्य एकनाथ खिल्लारे, प्रा. विलास वडजे, राहुल गोरे, प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, डॉ. आर.एम. जाधव, प्रा. डॉ. बालाजी कोम्पलवार, रोहिदास आडे, संदीप गायकवाड यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. भगवान जाधव यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. विशाल पतंगे यांनी केले.

## बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी

### गुणनियंत्रण कृषी अधिकारी एम.जी.सोनकांबळे यांचे आवाहन

देगलूर/प्रतिनिधी-फसवणूक होऊ नये यासाठी देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना काळजी घेण्याचे आवाहन तालुका गुणनियंत्रण कृषी अधिकारी एम.जी. सोनकांबळे यांनी केले आहे.

शेतकऱ्याने अधिकृत आणि परवानाधारक कृषी सेवा केंद्रातूनच बियाणे खरेदी करावे. कोणत्याही अनाधिकृत किंवा फिरत्या विक्रेत्याकडून बियाणे खरेदी करू नये तसेच बियाणे खरेदी केल्यानंतर विक्रेत्याकडून लॉट नंबर आणि बॅच नंबर नमूद केलेले पक्के बिल आवर्जून मागा आणि ते जपून ठेवावे. घेतलेले बियाणांचे पाकीट किंवा पिशवी कुठूनही फाटलेली किंवा शिवलेली नसावी. कंपनीचे अधिकृत सील आणि अंतिम तारीख व्यवस्थित असल्याची खात्री करून घ्यावी, पेरणी झाल्यानंतर बियाण्याची रिकामी पिशवी, टॅग आणि खरेदीचे पक्के बिल पीक हातात येईपर्यंत फेकून न देता सुरक्षित ठेवा. भविष्यात काही अडचण आल्यास हाच तुमचा कायदेशीर पुरावा ठरेल. बाजारातून बियाणे आल्यानंतर थेट पेरणी न करता, घरच्या घरी पोत्यावर किंवा कागदावर १०० दाणे ओले करून त्याचे उगवण क्षमता तपासा, जर ७०% पेक्षा कमी दाणे उगवले तर ते बियाणे पेरणीसाठी वापरू नका, बियाणे बोगस निघाल्यास किंवा फसवणूक झाल्यास घाबरून न जाता थेट तालुका कृषी अधिकारी किंवा पंचायत समितीचे कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार नोंदविण्याचे आवाहन कृषी गुण नियंत्रण अधिकारी एम.जी. सोनकांबळे यांनी केले आहे.

# माहूर न.पं.च्या ५ जागांची मतपेटी अकरा वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत

माहूर/प्रतिनिधी-माहूर नगर पंचायतीतील पाच अपात्र सदस्यांचे प्रकरण आता न्यायालयीन इतिहासातील दीर्घकालीन मालिका ठरण्याच्या मार्गावर आहे. २०१५ मध्ये सुरू झालेला हा राजकीय आणि कायदेशीर प्रवास तब्बल ११ वर्षांनंतरही लवकरच निकाल या आश्वासनावरच धावत असल्याचे चित्र आहे.

मागील १५ वर्षांच्या काळात देशात सरकारे बदलली, पक्ष फुटले, नोटाबंदी झाली, कोरोना आला-गेला, चंद्रावर मोहिमा पोहोचल्या; पण माहूरच्या त्या पाच मतपेट्या मात्र अजूनही तहसील कार्यालयातील स्ट्रॅाँग रूममध्ये लोकशाहीचा वनवास भोगत पडून आहेत. स्वपक्षीय नगराध्यक्षांविरुद्ध मतदान केल्याच्या आरोपावरून तत्कालीन जिल्हाधिकारी धीरज कुमार यांनी ३० जानेवारी २०१५ रोजी पाच महिला नगरसेविकांना अपात्र ठरविले होते. त्यानंतर संबंधित नगरसेविकांनी औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली आणि प्रकरण न्यायप्रविष्ट झाले. दरम्यान, रिक्त झालेल्या जागांवर निवडणूकही झाली, मतदानही झाले. पण मतमोजणी मात्र आजतागायत झाली नाही. कारण न्यायालयाचा अंतिम



निर्णय प्रलंबित आहे. विशेष म्हणजे, त्या निवडणुकीत उमेदवारी करणाऱ्या काही उमेदवारांचे निधनही झाले. त्यामुळे आता मतमोजणी झालीच तर काही निकाल थेट स्वर्गीय उमेदवारांच्या नावावर लागण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी उपरोधिक चर्चा शहरात रंगत आहे. तहसील कार्यालयातील स्ट्रॅाँग रूमही या प्रकरणामुळे अक्षरशः बंधक बनली असून, प्रशासनालाही आता त्या खोलीचा उपयोग विसरायला झाला असल्याची कुजबूज आहे. मतदान झालं तेव्हा आम्ही तरुण होतो, आता आमची मुलं मतदानाला तयार झालीत; पण त्या निवडणुकीचा निकाल अजून आलेला नाही, असे स्थानिक नागरिक बोलून दाखवत आहेत. एकूणच, माहूरमधील हे प्रकरण न्यायव्यवस्था, स्थानिक राजकारण आणि प्रशासन यांच्या गतीचा अनोखा संगम ठरत असून, निकाल आधी येणार की पुढची पिढी मतदान करणार? हा प्रश्न आता नागरिक उपरोधाने विचारू लागले आहेत.

# सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्र सरकारला फटकारे

## नीटच्या परीक्षेवर आता थेट मोदींचे लक्ष

नवी दिल्ली:नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणातील जबाबदारी निश्चित केल्याशिवाय समस्या संपणार नाही, अशा कठोर शब्दात सर्वोच्च न्यायालयाने एनटीए व केंद्र सरकारला फटकारले आहे. एनटीए अधिक सक्षम आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत सहा आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. २१ जून रोजी होणाऱ्या नीट परीक्षेवर थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लक्ष असणार असल्याचे सरकारी पक्षाच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात सांगण्यात आले.

नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या घटनांवरून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला कठोर शब्दांत फटकारले असून, अशा घटनांमुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे भविष्य धोक्यात येत असल्याची तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर नीट पेपरफुटीप्रकरणी दाखल विविध याचिकांवर सुनावणी सुरू आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने संस्थात्मक क्षमता विकसित करणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. तज्ज्ञ समितीच्या शिफारशींनुसार पुढील वर्षापासून नीट-यूजी परीक्षा संगणकाधारित चाचणी स्वरूपात घेण्याची तयारी सुरू असल्याचे एनटीएने सांगितले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होणार आहे. केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

# तुकाराम मुंढेंचा धडाकेबाज दणका!

## तीन दिवसांत ५३ धाडी;३३ जण तुरुंगात

मुंबई/प्रतिनिधी-आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीसाठी ओळखले जाणारे प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या तीन दिवसांतच ५३ धाडी टाकत ३३ जणांना अटक करण्यात आली आहे. या दरम्यान लाखो रुपयांचा बेकायदेशीर व भेसळयुक्त माल जप्त करण्यात आला आहे.

राज्याच्या अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मुंढे यांनी राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचे निर्देश दिले होते. त्यांच्या आदेशानंतर एफडीएच्या पथकांनी मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि कोकण विभागात एकाच वेळी विशेष मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान गुटखा, पानमसाला आणि अन्य प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या विक्रीवर लक्ष केंद्रित करण्यात आले. राज्यभरातील ५३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३४ ठिकाणी बंदी असलेल्या गुटखा व पानमसाल्याची विक्री सुरू असल्याचे आढळून आले. याप्रकरणी २५ गुन्हे दाखल करण्यात आले असून ३३ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच गुटखा वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी पाच वाहने जप्त करण्यात आली असून २७ आस्थापनांना सील ठोकण्यात आले आहे.

# शिवसंवाद कार्यक्रमात खा.डॉ.श्रीकांत शिंदे स्थानिक पत्रकारांना भेटलेच नाहीत!

हदगांव/प्रतिनिधी-हदगाव येथे गुरुवारी शिवसेनेच्या शिवसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी शिवसेना नेते व खा. श्रीकांत शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असल्याने स्थानिक पत्रकारांमध्ये उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र कार्यक्रमानंतर खासदारांची प्रत्यक्ष भेट होईल, या अपेक्षेवर पाणी फिरल्याने काही स्थानिक पत्रकारांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली.

शिवसंवाद कार्यक्रमापूर्वी काही प्रमुख वर्तमानपत्रांच्या स्थानिक प्रतिनिधींनी जिल्हास्तरीय पक्ष पदाधिकाऱ्यांकडे खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट घडवून देण्याची विनंती केली होती. त्यावेळी संबंधित पदाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत भेटीचे आश्वासन दिल्याचे सांगितले जाते. तसेच शिवसेना कार्यकर्त्यांचं 'शिवसंवाद' कार्यक्रम संपल्यानंतर खा.शिदे पत्रकारांशी संवाद साधतील, असा निरोपही काही पत्रकारांना देण्यात आला होता.यामुळे स्थानिक पत्रकारांनी कार्यक्रमस्थळी मोठ्या अपेक्षेने उपस्थिती लावली होती. कार्यक्रम जवळपास दीड ते दोन तास चालला. उन्हाची तीव्रता आणि उष्ण वातावरण सहन करत अनेक पत्रकार



कार्यक्रमस्थळाच्या परिसरात प्रतीक्षा करत होते. मात्र कार्यक्रम संपल्यानंतर खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जिल्हास्तरावरून आलेल्या काही इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधल्याचे दिसून आले, तर स्थानिक प्रिंट मीडियातील पत्रकारांना अपेक्षित भेट मिळाली नाही. कार्यकर्त्यांच्या गर्दीमुळे तसेच वेळेअभावी प्रत्यक्ष मुलाखत घेण्याची संधी हुकल्याने अनेक पत्रकारांचा हिरमोड झाला. विशेष म्हणजे यानंतरही संबंधित पदाधिकाऱ्यांनी प्रिंट मीडियाच्या प्रतिनिधींसाठी स्वतंत्र भेट आयोजित करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले नसल्याची भावना काही पत्रकारांनी व्यक्त केली. विधानसभा निवडणुकीपूर्वी तालुक्यातील एका गावात पुलाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी आले होते. कार्यक्रमा दरम्यान दरम्यान एका वृद्ध महिलेने घरकुलासाठी मदतीची विनंती केल्यानंतर त्यांनी तत्काळ कार्यकर्त्यांना आवश्यक मदत करण्याच्या सूचना दिल्याची घटना चर्चेत आली होती. याच पार्श्वभूमीवर स्थानिक पत्रकारांनी सध्याची राजकीय व आर्थिक परिस्थिती, राजकीय समीकरणे, शिवसंवाद दौऱ्याचा उद्देश, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, तसेच संभाव्य मंत्रिमंडळ विस्तारात जिल्ह्याला प्रतिनिधित्व मिळण्याबाबत अनेक प्रश्नांची तयारी केली होती. मात्र प्रत्यक्ष संवादाची संधी न मिळाल्याने हे प्रश्न अनुत्तरित राहिले. कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी काही निवडक वर्तमानपत्रांना जाहिराती देण्यात आल्याची चर्चा देखील पत्रकारांमध्ये होती.

# आ.श्रीजयाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त भोकर न.प.चे झाले फोटोसेशन

भोकर/प्रतिनिधी-खासदार, आमदार, मंत्री, नेत्यांचे वाढदिवस सामाजिक उपक्रमाने राबवले गेले पाहिजे. समाज हिताचे कार्यक्रम घेणे गरजेचे आहे मात्र भोकर विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीजया ताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त भोकर नगर परिषदेने केवळ एका रुग्णाला फळे वाटप केली. त्याचा फोटो काढला, हातात फक्त झाडू घेतला आणि स्वच्छतेचा देखावा म्हणून फोटो सेशन करून कार्यक्रम पार पडल्याने नेत्या विषयी कार्यकर्त्यांच्या मनात किती आस्था आहे याविषयी मात्र शहरात चर्चा रंगू लागली आहे.

माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांचा हा मतदार संघ असून विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी देऊन अनेक विकास कामे त्यांनी मार्गी लावली. काँग्रेस सोडून भाजपामध्ये आल्यानंतर देखील त्यांनी आपली राजकीय घडी व्यवस्थित बसवली. डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या भोकर नगरपरिषद निवडणुकीत भाजपची बहुमताने सत्ता आली. नगराध्यक्ष भाजपाचे झाले इतर पदे देखील भाजपाला मिळाले ६ महिने होऊन गेले तरी नगरपरिषदेच्या कारभारात मात्र म्हणावा तशी सुधारणा झालेली दिसलीच नाही. नाविन्य काहीच नाही मागे जे चालू होते तेच पुढेही चालू आहे. बदल झालेला जनतेला दिसून येत नाही. शहरातील बेशिस्त वाहतुकीची व्यवस्था जशीच्या तशी आहे, अतिक्रमणाबाबत कुठलेच पाऊल उचलल्या गेले नाही, उमरी रोडवर भर रस्त्यात भाजीपाल्याची बीट होते. त्याकडे नगर परिषदेचे लक्ष नाही, दैनंदिन बाजारामध्ये नागरिक व महिलांना जाता येत नाही भर रस्त्यात हा बाजार भरतो, पावसाळ्यामध्ये अनेक ठिकाणी शहरात पाणी साचून पाण्याचे डोह बनणार आहेत त्या कामी नगरपरिषदेने काहीच केले नाही, अनेक वार्डामध्ये घाण कचरा साचलेला असून दुर्गंधी पसरलेली आहे. गुंठेवारी फेरफार लेआउट फायली पूर्वीप्रमाणेच चालू आहेत. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी भोकरच्या विकासासाठी अनेक महत्त्वकांक्षी योजना राबविल्या आहेत. पुढे सुद्धा त्यांच्या नजरेत अनेक विकास कामे आहेत,आ. श्रीजया ताई चव्हाण यांनी देखील पित्याच्या पावलावर पाऊल ठेवून विकास कामांना प्राधान्य दिले आहे युवकांचे संघटन मजबूत करून उद्योगासाठी मेळावे घेतले आहेत २६ मे रोजी त्यांचा वाढदिवस होता त्यादिवशी खऱ्या अर्थाने सर्वसामान्य लोकांसाठी मोठे आरोग्य शिबिर, उद्योग मेळावा, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी जनता दरबार असे उपक्रम राबवायला पाहिजे होते. मात्र भोकर नगर परिषदेच्या वतीने ग्रामीण रुग्णालयात जाऊन एका रुग्णाला फळे वाटप करण्यात आले. त्याचे फोटो काढले त्यानंतर नगराध्यक्ष व नगरसेवकांनी हातात झाडू घेऊन फोटो काढले मात्र झाडून कुठे स्वच्छता केली नाही. केवळ फोटोसेशनसाठी वाढदिवस साजरा केल्याने भोकर शहरात मात्र नगर परिषदेच्या दिखाव्या कारभाराची चर्चा होऊ लागली आहे.

# शेत रस्ता मोकळा न केल्यास शेतकऱ्याने दिला उपोषणाचा इशारा

देगलूर/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील मौजे खतगाव (प.मु.), येथील अल्पभूधारक शेतकरी निवृत्ती अशोक करमले यांनी त्यांच्या शेतात जाणारा रस्ता तात्काळ मोकळा करून द्यावा, अन्यथा दि.४ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

मागील चार ते पाच वर्षांपासून शेतात जाण्यासाठी कोणताही रस्ता उपलब्ध नसल्याने शेतीची मशागत, पेरणी, वाहतूक व इतर शेतीविषयक कामे ठप्प झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर प्रकरणात तहसीलदार, मुखेड यांनी मामलेदार कोर्ट अधिनियम कलम ५ अंतर्गत सुनावणी घेऊन दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी शेत रस्ता उपलब्ध करून देण्याचा आदेश दिला होता. त्याविरोधात गैरअर्जदारांनी उपविभागीय अधिकारी, देगलूर यांच्याकडे अपील दाखल केले होते. त्यानंतर फेरचौकशी करून तहसीलदार, मुखेड यांनी दि.१७ एप्रिल रोजी पूर्वीचा आदेश कायम ठेवत अंतिम निर्णय दिला. त्यानंतर दि.२५ मे रोजी संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांना प्रत्यक्ष शेत रस्ता खुला करून देण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, गैरअर्जदारांनी मोठा जमाव जमवून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यामुळे रस्ता खुला होऊ शकला नसल्याचा आरोप निवृत्ती करमले यांनी केला आहे. रस्ता नसल्याने ट्रॅक्टर व शेती अवजारे शेतात नेता येत नसल्यामुळे यावर्षी शेतीची पूर्व मशागतही करता आलेली नाही. त्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली असून उदरनिर्वाहासाठी कुटुंबाला हैदराबाद येथे स्थलांतर करावे लागल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# लोहा-कंधार तालुक्याची शिवसेनेची कार्यकारणी बरखास्त

कंधार/प्रतिनिधी-खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२७ मे रोजी नांदेड येथे महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीत लोहा-कंधार, दक्षिण नांदेड व उत्तर नांदेड या क्षेत्रातील संघटनात्मक कामाचा आढावा घेण्यात आला. शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मतदारसंघनिहाय कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सर्व कार्यकर्त्यांचे मनोगत जाणून घेत पुढील पक्ष संघटना वाढीसाठी आवश्यक सूचना दिल्या. याच बैठकीत लोहा-कंधार तालुक्यातील संपूर्ण कार्यकारणी व पदाधिकारी मंडळ बरखास्त करून नव्याने पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे सर्व अधिकार माजी आमदार तथा शिवसेना शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे यांना देण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. या बैठकीस आ.हेमंत पाटील, शंकर अण्णा धोंडगे, आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंदराव बोंढारकर, संपर्कप्रमुख रमाकांत मडावी, जिल्हाप्रमुख विनय गिरडे, उमेश मुंडे तसेच निरीक्षक संजय लाखे उपस्थित होते. येत्या दोन आठवड्यांत दोन्ही तालुक्यातील जुने व नवे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यात येणार आहेत. सर्वांना विश्वासात घेऊन व सर्वांच्या सहमतीने नवीन कार्यकारणीची निवड करण्यात येईल, अशी माहिती शंकर अण्णा धोंडगे यांनी दिली.

पान १ वरुन

## दिल्लीत मोठा दहशतवादी...

त्यांना ताब्यात घेण्यात आले.तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेले नऊ जण दिल्ली, मुंबई आणि पंजाबमधील रहिवासी आहेत. त्यापैकी काही जण परदेशी नागरिक असल्याचेही समोर आले आहे.

## अस्तित्वात नसलेल्या शिवकृपा कृषी सेवा केंद्रावर...

या चर्चेत कितपत तथ्य आहे, याची चौकशी होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.निलंबित सात कृषी सेवा केंद्रांकडे तब्बल १४,८४८ पोते खत शिल्लक असल्याने हा साठा कृषी विभागाने स्वतःच्या नियंत्रणाखाली शेतकऱ्यांना विक्री करावा, अशी मागणीही जोर धरत आहे.एकूणच, शिवकृपा कृषी सेवा केंद्र प्रकरणामुळे कृषी विभागाच्या परवाना व्यवस्थापन, स्थलांतर प्रक्रिया आणि पडताळणी यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी होत आहे.

## वादळी पावसाचे बिहारमध्ये...

अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.हवामान विभागाने ३१ मे आणि १ जून रोजी ईशान्य बिहारातील काही भागांमध्ये हवामान आणखी बिघडण्याची शक्यता वर्तवली आहे. मात्र उत्तर बिहारच्या पूर्व आणि मध्य भागातील काही जिल्ह्यांमध्ये कोरडे हवामान राहण्याचा अंदाज आहे.

पान १ वरुन

## भर उन्हात जरांगे-विखे पाटलांत...

प्रमाणपत्र वाटप आणि जात पडताळणीसाठी ८ दिवसांत हेल्पलाइन सुरू होणार., कुणबी प्रमाणपत्र वितरणासाठी स्वतंत्र एसओपी (मानक कार्यपद्धती) तयार करण्यात आली आहे., आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना १५ दिवसांत आर्थिक मदत दिली जाणार.,कामात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार.

### जरांगे यांच्या प्रमुख १० मागण्या

मराठवाड्यातील सर्व मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देणे, विविध संस्थानांच्या नोंदींवर आधारित जीआर काढणे, आंदोलनातील गुन्हे मागे घेणे, बलिदान दिलेल्या कुटुंबीयांना नोकरी देणे, सारथीच्या योजना पुन्हा सुरू करणे, कुणबी प्रमाणपत्रांची वैधता देणे, स्वतंत्र मराठा व कुणबी मंत्रालय स्थापन करणे आणि शिंदे समितीला मुदतवाढ देणे या प्रमुख मागण्या जरांगे यांनी सरकारसमोर ठेवल्या आहेत.

## एका कर्जासाठी दोन जमिनी...

काम रखडले आहे. एका सहकार क्षेत्रातील प्रभावशाली पदाधिकाऱ्याच्या बँकेच्या संचालक मंडळातील पुत्राचा या व्यवहारात दबाव किंवा हस्तक्षेप होता का, याचीही आता चर्चा सुरू झाली आहे. एक कागद कमी पडला तरी सामान्य शेतकऱ्यांचे कर्ज नाकारणारी बँक बंद पडलेल्या संस्थेला नियम मोडून एवढे मोठे कर्ज कसे देते? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या संपूर्ण व्यवहाराची आर्थिक गुन्हे शाखा, सहकार विभाग आणि महसूल प्रशासनामार्फत सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली असून कृषी उत्पन्न बाजार समितीतील एका संचालकाकडून लवकरच कायदेशीर फिर्याद दाखल होण्याची शक्यता आहे.

# गोरक्षक हत्या प्रकरणी आणखी एका फरार आरोपीस अटक

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड तालुक्यातील सुकळी (ज) येथे दि.२३ रोजी गोरक्षक हत्या प्रकरणातील निष्पन्न व फरार आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते, या हत्या प्रकरणातील सहा आरोपींना पोलिसांनी या अगोदर अटक केली होती तर त्याच घटना प्रकरणातील आणखी एका फरार आरोपीला गुन्हे शोध पथकाने हदगाव तालुक्यातील तामसा येथे पाठलाग करुन अटक केली आहे.

मोहम्मद अजिज मोहम्मद हनीब, रा. भगतसिंग वार्ड, उमरखेड असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून घडलेल्या घटने पासून हा फरार होता. उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड तसेच पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सागर इंगळे व डीबी पथकाने गोपनीय माहिती गोळा करीत हा तपास जारी ठेवला होता. यावेळी आरोपी मोहम्मद अजिज मोहम्मद हनीब हा निजामाबादवरून तामसा येथे येणार असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याच बरोबर पोलिसांनी सायबर सेलच्या मदतीने सापळा रचत आरोपीचा पाठलाग केला आणि आपल्या पोलिस कौशल्याचा वापर करून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. या गुन्ह्यात आतापर्यंत एकूण सात आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# विश्वनाथ लोखंडे यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-हडको नवीन नांदेड येथील उपासक विश्वनाथ लक्ष्मणराव लोखंडे (वय ५२) यांचे शुक्रवार दि.२९



रोजी छत्रपती संभाजीनगर येथे उपचारा दरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सिडको नांदेड येथील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, चार भाऊ, भावजया असा परिवार आहे. प्रा. भाग्यलक्ष्मी लोखंडे यांचे ते वडील तर उद्धव लोखंडे व सामाजिक कार्यकर्ते दिगंबर लोखंडे यांचे ते बंधू होत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४